श्रीसिद्धिविनायक

# श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर न्यास

(महाराष्ट्र शासन नियंत्रित)
एस.के.बोले मार्ग, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२८
दुरध्वनी : ०२२-२४२२४४३८ । २४२२१५५८
ईमेल : admin@siddhivinayak.org । info@siddhivinayak.org
वेब : www.siddhivinayak.org

दि. ०७.०३.२०२५

## दरपत्रके मागविण्यासंदर्भातील सूचना

## प्रथम मुदतवाढ

**विषय : श्रीसिध्दिविनायक मंदिरात दूधापासून बनविण्यात येणाऱ्या पदार्थांचा पुरवठा करण्याबाबत**

**कालावधी**

**१ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६**

श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिरात, दूधापासून बनविण्यात येणारे पदार्थ पुरवठा करण्याकरीता खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून विहित पध्दतीने वर्षभरासाठी मोहरबंद दरपत्रके मागविण्यात आली होती. परंतु एकाच पुरवठादाराने प्रतिसाद दिल्याने प्रथम मुदतवाढ देण्यात येत आहे.

वरील कामाकरीता अटी, शर्तीबाबतची माहिती व दरपत्रके डाउनलोड करण्यासाठी न्यासाच्या www.siddhivinayak.org या संकेत स्थळावर भेट द्यावी.

| | | |
|---|---|---|
| दरपत्रके प्रसिध्दीचा दिनांक | : | सोमवार, दि. २४ फेब्रुवारी २०२५ |
| दरपत्रके सादर करण्याचा अंतिम दिनांक | : | सोमवार, दि. १७ मार्च २०२५,सांय. ५ वाजेपर्यंत |
| दरपत्रके उघडण्याचा दिनांक | : | बुधवार, दि. १९ मार्च २०२५, दु. २ वाजता |

अटी व शर्ती :

१) मूळ दरत्रकात नमूद निर्देशनाप्रमाणे (Specification) दूधापासून बनविण्यात येणारे पदार्थ खरेदी करण्यासाठी मोहरबंद दरपत्रके मागविण्यात येत आहे.

२) पुरवठादाराकडून प्राप्त होणाऱ्या मालाचा दर्जा उत्तम असणे आवश्यक आहे. तसेच ३ वर्षाचा अनुभव दर्शविणारी कागदपत्रे सादर करावी.

३) दरपत्रकधारकाचे कार्यालय न्यास कार्यालयापासून २० किमी अंतरावर असणे आवश्यक आहे.

४) दूधापासून बनविण्यात येणारे पदार्थ न्यासाच्या खरेदी विभागात पॅकिंग व फॉरवडींगसह पोच करणे आवश्यक राहील. मालाच्या वाहतुकीचा खर्च वेगळा दिला जाणार नाही तसेच मालाच्या पुरवठयाबाबत आगाऊ रक्कम दिली जाणार नाही.

५) सदर पदार्थाचे कार्यादेश प्राप्त झाल्यापासून २ दिवसात पुरवठा करण्याची जबाबदारी आपली राहील. पुरवठा वेळेत न केल्यास किंवा खराब पदार्थांचा पुरवठा केल्यास तुमच्या देयकातून २०% रक्कम कपात करण्यात येईल. पुरवठाचे काम पुर्ण केल्यावर न्यासास बिल सादर करताना बिलामध्ये पॅन कार्ड/जीएसटी क्रमांक व कंपनीच्या बॅंकेचा तपशील नमूद करणे.

६) जी एस टी क्रमांक लागू नसल्यास कंपनी लेटरहेडवर तसे नमूद करून दरपत्रकासोबत सादर करावे.

७) दरपत्रकधारकाने मोहोरबंद दरपत्रकासोबत साक्षांकित करून सादर करावयाची कागदपत्रे :

अ) कंपनी नोंदणीचा दाखला

ब) सेवाकर जी.एस.टी नोंदणी / ट्रेडिंग लायसन्स

क) आयकर नोंदणी कार्ड (पॅन कार्ड)

ड) अटी व शर्ती क्र. २ प्रमाणे

८) दरपत्रक भरतांना सर्व प्रकारचे कर वगळून रक्कम भरावी. दरपत्रकामध्ये स्वीकृत दर अखेर पर्यंत कायम राहतील. कोणत्याही प्रकारची भाववाढ दिली जाणार नाही.

९) नियमानुसार आवश्यक आयकर रक्कमेची कपात करण्यात येईल. तसेच सर्व प्रकारचे कर अदाकरणेची जबाबदारी दरपत्रकधारकाची राहील.

१०) कोणतीही कारणे न देता दरपत्रक स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार न्यासास असेल.

११) कागदपत्रे सादर करण्यास असमर्थ ठरलेल्या दरपत्रकधारकाचे दरपत्रक निवड प्रक्रीयेतुन बाद करण्यात येईल.

१२) दूधापासून बनविण्यात येणारे पदार्था संबधी कोणत्याही प्रकारच्या माहितीची आवश्यकता असल्यास श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी कार्यालयात दूरध्वनी क्र.०२२–६२४९११६० वर संपर्क साधावा.

१३) उपरोक्त अटी व शर्तीत काही बदल, सुधारणा करण्याचा, शिथिल करण्याचा वा जादा अटी शर्ती विहीत करण्याचा अधिकार न्यास व्यवस्थापनाने राखून ठेवलेला आहे. आपली कोणतीही अट/अटी न्यासावर बंधनकारक राहणार नाहीत.

१४) दूधापासून बनविण्यात येणारे पदार्थाचां पुरवठा कालावधी समाप्त झाल्यास, पुढील मोहरबंद दरपत्रके किंवा ई–निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत पदार्थाचां पुरवठा वरील मान्य दरानुसार न्यासाच्या खरेदी विभागात पोहच करावयाचा आहे.

१५) दरपत्रकधारकाने लिफाफा देताना तांत्रिक दरपत्रक व मुल्य दरपत्रक तपशिल याप्रमाणे दोन वेगवेगळया लिफाफामध्ये भरुन त्यावर संपूर्ण नाव, पत्ता, दूरध्वनी क्रमांक त्यावर लिहून, लाखेने सिलबंद करून न्यास कार्यालयात जमा करावे.

Vpatil

(वीणा पाटील)

कार्यकारी अधिकारी